Impact Factor-7.675 (SJIF) ISSN-2278-9308


# B.Aadhar


Peer-Reviewed & Refreed Indexed

Multidisciplinary International Research Journal

February -2021

ISSUE No- (CCLXXI) 271





**Chief Editor**
Prof. Virag S. Gawande
**Director**
Aadhar Social
Research & Development
Training Institute Amravati

**Editor:**
Dr.Dinesh W.Nichit
**Principal**
Sant Gadge Maharaj
Art's Comm,Sci Collage,
Walgaon.Dist. Amravati.

**Executive Editor:**
Dr.Sanjay J. Kothari
Head, Deptt. of Economics,
G.S.Tompe Arts Comm,Sci Collage
Chandur Bazar Dist. Amravati

This Journal is indexed in :
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- International Impact Factor Services (IIFS)

For Details Visit To : www.aadharsocial.com

Aadhar PUBLICATIONS

| | | |
|---|---|---|
| 21 | कोरकु आदिवासी शिशु संस्कार विधीपर तंत्रज्ञान का प्रभाव **सहा. प्रा. आनंद गो. मनवर** | 86 |
| 22 | वऱ्हाडी लोकसाहित्यातून अविष्कृत होणाऱ्या पारंपारिक जीवन पद्धती **डॉ. राखी मंगेश जाधव** | 89 |
| 23 | कोविड –2019 चा भारताच्या आर्थिक क्षेत्रावर परिणाम व सरकारी उपाययोजना **प्रा. व्हि.व्हि. खांडेकर** | 93 |
| 24 | संतश्रेष्ठ तुकाराम आणि त्यांचे अभंग **प्रा.डॉ.प्रशांत वाल्मिकराव धनवीज** | 98 |
| 25 | मराठी शाहिरी वाङ्मयाची जडणघडण **प्रा.डॉ.राकेश दे.कभे** | 106 |
| 26 | साठोत्तरी मराठी ग्रामीण कथा आणि वास्तव **डॉ. हर्षा पं. येवले (सौ. हर्षा ढाले)** | 110 |
| 27 | बीड जिल्ह्यातील महिला सरपंचाच्या कुटुंबातील दर्जाचा समाजशास्त्रीय अभ्यास **डॉ.सुधीर आ.येवले, डॉ.रुपाली कुलकर्णी** | 115 |
| 28 | भारतीय शास्त्रीय संगीताचा आत्मा-बंदिश **डॉ. अर्चना संदीप देशपांडे** | 120 |
| 29 | कोरोना स्वयंपूर्ण गाव अर्थव्यवस्थेचा सुधार एक दृष्टीक्षेप **प्रा. डॉ. जयंत एम. बनसोड** | 124 |
| 30 | व्यावसायीक संदेशवहन : उद्दीष्टे महत्व आणि व्याप्ती **प्रा.डॉ.सर्जेराव राजाराम कहाळे** | 129 |
| 31 | भालचंद्र नेमाडेची स्त्रीविषयक भूमिका आणि त्यांची कादंबरी **प्रा. दिलीप घोनमोडे** | 132 |
| 32 | ग्रंथपालन व्यवसाय विकासामध्ये भारतीय ग्रंथालय संघाची भुमीका : एक अभ्यास **गणेश वा. निशाणे** | 135 |
| 33 | सार्वजनिक क्षेत्राच्या बँकेतील सुधारण : एक अध्ययन **प्रा. डॉ. विजय के.बन्सोड** | 138 |
| 34 | "प्रतिभावंत साहित्यिक अण्णा भाऊ साठे" **प्रा. डॉ. विजयकुमार सुरेंद्र विनोदकर** | 143 |
| 35 | किन्नरों का समाजशास्त्रीय विश्लेषनात्मक अध्ययन **डॉ. प्रमिला हरीदास भुजाडे** | 147 |
| 36 | लोकसत्ताक भारताची गरज : भगवान बुद्ध आणि त्यांचा धम्म **डॉ. प्रतिभा गौ. ताकसांडे** | 154 |
| 37 | बहुराष्ट्रीय कंपन्यांची भूमिका : एक अभ्यास **डॉ. सुधाकर सोनोने** | 163 |
| 38 | पश्चिम विदर्भातील स्वदेशी आंदोलन **डॉ. गजानन बापूराव ठाकरे** | 167 |
| 39 | सत्यशोधक जगदेवराव भालेराव **डॉ. किशोर मारोती वानखडे.** | 172 |
| 40 | महाराष्ट्रातील सार्वजनिक ग्रंथालय : एक अध्ययन **प्रा. सचिन गणपतराव कर्णेवार** | 177 |




DR. K. UMATHE COLLEGE NAGPUR

***B.Aadhar*** International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor - ( (SJIF) -7.675, Issue NO, 271(CCLXXI)
ISSN : 2278-9308
Fabruary, 2021

# सार्वजनिक क्षेत्राच्या बँकेतील सुधारण : एक अध्ययन

प्रा. डॉ. विजय के.बन्सोड
सहयोगी प्राध्यापक,अर्थशास्त्र विभाग प्रमुख
डॉ. एम.के. उमाठे कॉलेज नागपूर २२.

**प्रास्ताविक :**

भारतीय बँकिंग कंपनी अॅक्ट १९४९---"बँकिंग कंपनी ती कंपनी आहे जी बँकिंगचे कार्य कतरे. बँकिंग म्हणजे लोकांना उधार देण्याकरिता अथवा विनीयोग करण्याकरिता मुद्रा ठेवीच्या रूपाने स्वीकारणे होय. अशा ठेवी मागणी करताच अथवा धनादेश, विकर्ष, आदेश यांच्या द्वारे शोधनीय असतात."

या तत्वानुसार भारतात स्वातंत्र्यानंतर बँकांची वाटचाल सुरू झाली. पुढे बँकेचे कार्य ठेवी स्वीकारणे व कर्ज देणे एवढ्यापुरतेच मर्यादित न राहता प्रत्यय निर्मिती हे मोठे शस्त्र बँकाजवळ आले. या शस्त्रामुळे बँका आता श्रीमंत होऊ लागल्या होत्या. त्या बँका खाजगी भांडवलदारांच्या असल्यामुळे खाजगी भांडवलदार व बँकांचे शेअरधारक अधिक श्रीमंत होत गेले. बँकिंग क्षेत्र व त्याचे फायदे केवळ काही विशिष्ट वर्गापुरतेच मर्यादित होते.

बँकिंग क्षेत्राचे फायदे देश, अर्थव्यवस्था व सामान्यांपर्यंत पोहचवीने दुरापास्त झाले होते. भारतात इंपीरियल बँकेचे राष्ट्रीयकरण व १९५५ साली स्टेट बँक ऑफ इंडियाच्या स्थापनेपासूनच बँकांच्या राष्ट्रीयकरणाला चालना मिळाली होती. म्हणूनच समुचीत प्रत्यय नियंत्रण करणे, व्यापारचक्र पासून अर्थव्यवस्थेचा बचाव करणे, समाजवादी रचनेचे ध्येय साध्य करणे, व्यापारी बँकेच्या खाजगी धोरणावर नियंत्रण आणणे, बँकांच्या लाभावर सामाजिक मालकी प्रस्थापित करणे, आर्थिक नियोजन सफल करणे, ठेवीदार व कर्जदार यांचे हित साधने, मौद्रीक एकत्रीकरण, देशातील औद्योगिक व ग्रामिण अर्थपुरवठ्यांना साहय्य करणे, विदेशी बँकांशी स्पर्धा करणे इत्यादी कारणांसाठी १९ जुलै, १९६९ रोजी १४ बँकांचे व १५ एप्रिल १९८० रोजी ६ बँकांचे राष्ट्रीयकरण करण्यात आले. आता भारतीय बँकिंग क्षेत्र हे विशिष्ट वर्गाकरिता मर्यादित न राहता ते आता सर्व सामान्यांसाठी कार्य करू लागले होते. (Banking sector converts classes in to masses).

**शोधनिबंधाची उद्दिष्टे :**

१. सार्वजनिक क्षेत्रातील बॅकांचा अभ्यास करने.
२. सार्वजनिक क्षेत्रातील बॅकेतील सद्यास्थितीचा अभ्यास करने..
३. सार्वजनिक क्षेत्रातील सार्वजनिक क्षेत्रातील बँकिंग क्षेत्रातील सुधारणेचे फायदे तोटे अभ्यासणे.

सन २०१७ पर्यंत भारतात सार्वजनिक क्षेत्रातील २७ बँका कार्यरत होत्या. या बँका खालील प्रमाणे आहेत.

**बॅकेचे नाव विलिनीकरनाचे वर्ष**

| | | |
|---|---|---|
| १) | स्टेट बँक ऑफ इंडिया (सहयोगी बँका) | — १९५५ |
| २) | स्टेट बँक ऑफ इंदौर सौराष्ट्र | —२०१० |
| ३) | स्टेट बँक ऑफ हैद्राबाद | — २०१७ |
| ४) | स्टेट बँक ऑफ बिकानेर अॅण्ड जयपुर | — २०१७ |
| ५) | स्टेट बँक ऑफ मैसूर | — २०१७ |



DR. M. K. UMATHE COLLEGE NAGPUR

| | | |
|---|---|---|
| ६) | स्टेट बँक ऑफ पटियाला | — २०१७ |
| ७) | स्टेट बँक ऑफ त्रावणकोर | — २०१७ |
| ८) | भारतीय महिला बँक | — २०१७ |
| ९) | आंध्रा बँक | — १९८० |
| १०) | अलाहाबाद बँक | — १९६९ |
| ११) | बँक ऑफ बडोदा | — १९६९ |
| १२) | बँक ऑफ इंडिया | — १९६९ |
| १३) | बँक ऑफ महाराष्ट्र | — १९६९ |
| १४) | सेंट्रल बँक ऑफ इंडिया | — १९६९ |
| १५) | कॅनरा बँक | — १९६९ |
| १६) | देना बँक | — १९६९ |
| १७) | कार्पोरेशन बँक | — १९८० |
| १८) | इंडियन बँक | — १९६९ |
| १९) | इंडियन ओवरसीस बँक | — १९६९ |
| २०) | ओरीयंटल बँक ऑफ कॉमर्स् | — १९८० |
| २१) | पंजाब अॅण्ड सींध बँक | — १९६९ |
| २२) | सिंडीकेट बँक | — १९६९ |
| २३) | युको बँक | — १९६९ |
| २४) | युनियन बँक ऑफ इंडिया | — १९६९ |
| २५) | विजया बँक | — १९६९ |
| २६) | पंजाब नॅशनल बँक (न्यु. बँके ऑफ इंडिया सम्मीलीत १९९३) | — १९६९ |
| २७. | आय.डी.बी.आय. बँक | — १९६४ |

वरिल सर्व बँकांनी देशाच्या अर्थव्यवस्थेला उत्तुंग अशी भरारी देण्याचे अती उत्तम कार्य केले. १९९३ मध्ये न्यु बँक ऑफ इंडिया या बँकेचे दिवाळे निघाल्यामुळे तिला पंजाब नॅशनल बँकेत विलय करण्यात आले. १९९१ च्या उदारीकरण धोरणांतर्गत खाजगी बँका मोठ्या प्रमाणात उघडण्यात आल्या. त्यांना मिळालेले सरकार व खाजगी उद्योगपतींचे प्रोत्साहन यामुळे आता खाजगी बँकाचा विस्तार व सार्वजनिक क्षेत्रातील बँकाचा ऱ्हास सुरू झाला आहे. सार्वजनिक क्षेत्रातील बँकात वाढलेला भ्रष्टाचार, कर्ज बुडव्यांच्या संख्येत झालेली वाढ, लालफित शाही, राजकियीकरण, मंत्र्यांचा हस्तक्षेप, कर्मचारी संघटनेचे केवळ पगार वाढीकडेच लक्ष, आधुनिकीकरण व उच्च सेवांचा अभाव, वाढते थकीत कर्ज, सरकारी उदासिनता, नॉन परफॉर्मिंग मालमत्तेत वाढ यामुळे आता उत्तुंग शिखरावर असलेल्या सार्वजनिक क्षेत्रातील बँकांना उतरती कळा लागली होती. यामुळेच सार्वजनिक क्षेत्रातील बँकांचा आता उलटा प्रवास सुरू झाला आहे.

**बँकिंग क्षेत्रातील सुधारणेची पार्श्वभूमी :**

२०१४ साली भारतीय जनता पक्षाचे सरकार सत्तेत आल्यापासूनच सार्वजनिक क्षेत्रातील बँकाच्या सुधारणेचे पर्व सुरू झाले. या सरकारच्या काळात कर्ज बुडव्यांच्या संख्येत वाढझाली तसेच अनेक कर्ज बुडवे उद्योगपती विदेशात पळुन गेलेत तसेच कॉंग्रेसप्रणित सरकारच्या कालावधीत अधिक परताव्याच्या आशेने बँकांनी सढळ हस्ते कर्ज दिले व उद्योजक व व्यापाऱ्यांनी ते घेतले. मात्र नवीन सरकारच्या काळात ढासळत्या आर्थिक कामगिरीमुळे व्यापारी व उद्योगपती कर्ज फेडू शकले नाहीत. त्यामुळे बँका तोट्यात आल्या व त्यांच्या एन.पी.ए. (Non Performing



DR. M. K. UMATHE COLLEGE NAGPUR

Assest) मध्ये वाढझाली. या संकटातुन वाट काढण्यासाठी सन २०१४ मध्ये 'ज्ञानसंगम' या वार्षिक सम्मेलनात (इंद्रधन्युष २.०) सरकारी बँकेत सुधारणा हा सात कलमी कार्यक्रम आखला गेला. यात या बँकांच्या उभारणीसाठी गुंतवणूक, घोटाळे थांबविण्यासाठी बँकतील प्रमुख (C.M.D.) हे पद दोन भागात विभागून (C.M..D. व C.M.O.) हे पद निर्माण केल्या गेले. हे पद ६ सदस्यांच्या चमुद्वारा निवडण्याचा निर्णय झाला. यात कोणताही राजकीय हस्तक्षेप नसेल तसेच सार्वजनिक क्षेत्रातील बँकांची पुनर्पूजीकरन, विलीनीकरण,संख्या घटविने या मुख्य बाबी होत्या.

**बँकिंग क्षेत्रातील सुधारणा--**

- आय.डी.बी.आय. (Industrial Development Bank of India) चे शेअर एल.आय.सी. (L.I.C.) ने २१ जानेवारी २०१९ ला विकत घेतले. त्यामुळे भारतीय रिजर्व बँकेने या बँकेस खाजगी बँक म्हणून घोषीत केले.
- स्टेट बँक ऑफ इंडियात तिच्या सात सहयोगी बँकांचे सम्मीलीकरण १एप्रिल, २०१७ रोजी करण्यात आले.
- १ एप्रिल, १९९९ ला बँक ऑफ बरोडा या बँकेत विजया बँक व देना बँका यांचे विलीनीकरण करण्यात आले.
- १ एप्रिल, १९१९ ला पंजाब नॅशनल बँकेत ओरिएंटल बँक ऑफ कॉमर्स व युनायटेड बँक ऑफ इंडिया यांचे विलीनीकरण करण्यात आले.
- १ एप्रिल, १९१९ ला कॅनरा बँकेत सींडीकेट बँकेचे विलीनीकरण करण्यात आले.
- १ एप्रिल, १९१९युनियन बँक ऑफ इंडियात आंध्रा बँक, कार्पोरेशन बँकेचे विलीनीकरण करण्यात आले.
- १ एप्रिल, १९१९ ला इंडियन बँकेत अलाहबाद बँकेचे विलीनीकरण करण्यात आले.

**भारतातील १ एप्रिल,२०२०रोजी सार्वजनिक क्षेत्रातील बँकांची स्थिती :**

देशात सार्वजनिक क्षेत्रातील एकत्रीत सर्व बँकांचा व्यवसाय हा ८२ टक्के असून व्यापारी बँकांच्या ५६ टक्के व्यवसाय या बँकांच्या हाती आहे.

१ एप्रिल, २०२० नुसार प्रमुख बँकां सम्मीलीत झाल्यास त्यांचा व्यवसाय व त्यांची क्रमवारीकरिता खालीलप्रमाणे राहिल.

| अ. क्र. | प्रमुख बँका | विलिनीकृत बँका | व्यवसाय लाख करोड मध्ये | सार्वजनिक बँकिंग क्षेत्रातील क्रम |
|---|---|---|---|---|
| १. | स्टेट बँक ऑफ इंडिया | पूर्वीच सम्मीलत सात सहयोगी बँका | ५२.०५ | १ |
| २. | पंजाब नॅशनल बँक | ओरिएंटल बँक ऑफ कॉमर्स, युनायटेड बँक ऑफ इंडिया | १७.९४ | २ |
| ३. | बँक ऑफ बरोडा | विजया बँक, देना बँक पूर्वीच सम्मीलीत | १६.१३ | ३ |
| ४. | कॅनरा बँक | सींडीकेट बँक | १५.२० | ४ |
| ५. | युनियन बँक ऑफ इंडिया | आंध्रा बँक, कार्पोरेशन बँक | १४.५९ | ५ |
| ६. | बँक ऑफ इंडिया | — | ९.०३ | ६ |



DR. M. K. UMATHE COLLEGE NAGPUR

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor - ( (SJIF) -7.675, Issue NO, 271(CCLXXI)
ISSN : 2278-9308
Fabruary, 2021

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ७. | इंडियन बँक | अलाहबाद बँक | ८.०८ | ७ |
| ८. | सेंट्रल बँक ऑफ इंडिया | — | ४.६८ | ८ |
| ९. | इंडियन ओवसिस बँक | — | ३.७५ | ९ |
| १०. | युको बँक | — | ३.१७ | १० |
| ११. | बँक ऑफ महाराष्ट्र | — | २.३४ | ११ |
| १२. | पंजाब ॲण्ड सींध बँक | — | १.७१ | १२ |

वरिल सारणीवरूण स्पष्ट होते की, आजच्या घडीला सार्वजनिक क्षेत्रातील बँकांची संख्या २७ वरून १२ पर्यंत खाली आलेली आहे.

सार्वजनिक क्षेत्रातील सुदृढ बँकांत कमजोर बँकांच्या सम्मीलीनीकरणामुळे बँकेच्या नफ्यात व नॉन परफॉर्मिंग असेटस् मध्ये घट दिसून आली असून कमजोर बँकेतील कर्मचाऱ्यांना मोठ्या व सुदृढ बँकेत काम करण्याच्या संधीमुळे तेही उत्साहित असल्याचे सांगितले जाते.

**सार्वजनिक क्षेत्रातील बँकेतील सुधारणे मुळे झालेले फायदे :**

सार्वजनिक क्षेत्रातील बँकात सुधारणा घडवून आणल्यामुळे या बँकांना खालील फायदे झाले आहेत.

१) सार्वजनिक क्षेत्रात कमी पण आर्थिक सुदृढ व सक्षम बँकांची नोंदझाली.
२) सार्वजनिक क्षेत्रातील बँकांची संख्यात्मक घट होऊन गुणात्मक वाढझाली आहे.
३) सार्वजनिक क्षेत्रातील बँकांची संख्या कमी झाल्यामुळे सरकारला या क्षेत्रात देखरेखी साठी सोपी झाले.
४) सार्वजनिक क्षेत्रातील बँकातील घटीमुळे त्यांच्यात स्पर्धा निर्माण होऊन अधिक व्यवसाय व नफा मिळविण्याची चुरस निर्माण झाली.
५) सार्वजनिक क्षेत्रातील सर्व बँकांच्या व्यवसायात व नफ्यात वाढझाली आहे.
६) कर्ज बुडव्यांच्या संख्येत घट होऊन नॉन परफॉर्मिंग असेटस् मध्ये घट झाल्याचे दिसून येते.
७) बी.एस.एल.— ३ नुसार बँका कार्य करण्यास प्रवृत्त झाल्याने बँकिंग क्षेत्र अधिक पारदर्शी कार्य करू शकेल.
८) बँकांच्या शेअरच्या किंमतीत वाढझाल्याचे दिसून येते.
९) ग्राहकांना अधिकाधिक चांगल्या सोयी व तांत्रीक फायदे मिळु लागले आहेत.
१०) बँकिग क्षेत्र आर्थिक सक्षम झाल्यामुळे देशाच्या अर्थव्यवस्थेच्या बळकटीसाठी चालना मिळाली आहे.

**सार्वजनिक क्षेत्रातील बँकेतील सुधारणेमुळे झालेले तोटे —**

१) बँकिंग क्षेत्र विशिष्टांकडुन सामान्यांकडे येण्यासाठी बँकांचे राष्ट्रीयकरण झाले होते. आता हे क्षेत्र परत विशिष्टांकडे जाण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे.
२) प्रमुख बँकात सम्मीलीत झालेल्या सम्मीलीत बँकेतील कर्मचारी फारसे समाधानी व उत्सुक नाहीत.
३) सार्वजनिक क्षेत्रातील बँकेत घट झाल्याने खाजगी क्षेत्रातील बँका अधिक वरचढझाल्यात ही शक्यता नाकारता येत नाही.
४) सार्वजनिक क्षेत्रातील बँकांची संख्या कमी झाल्यामुळे रोजगारात घट झाल्याचे दिसून येते.



DR. M. K. UMATHE COLLEGE NAGPUR

५) सार्वजनिक क्षेत्रातील कमी पण सक्षम या धोरणामुळे या बँकेतील गर्दी वाढली असून कर्मचाऱ्यांवर अधिक ताण आल्याचे दिसून येते.

६) ग्राहकांना सक्षम व सुदृढ बँकेच्या सोयी मिळत असल्यातरी बचतकर्त्यांना व्याज कमी मिळत असून सामान्य सेवेचे देखील बँका शुल्क वसुल करीत आहेत.

७) बँकिंग कार्यात इलेक्ट्रॉनीक उपकरणाच्या वापरात वाढझाल्यामुळे ग्राहकांच्या सोयीत वाढझाली असली तरी ग्राहकांना फसवणुकीचे प्रकारात मोठ्या प्रमाणात वाढझाल्याचे दिसून येते.

८) सर्वसामान्य गरीब लोकांना या बँकेत वाढत्या स्पर्धेमुळे पूर्वी सारखे सन्मानाचे स्थान राहिलेले नाही.

९) जनधन खाते व इतर सबसीडी ही खातेदारांच्या खात्यात सरकारद्वारे वर्ग करण्यात आल्यामुळे बँकावरचा ताण वाढला आहे.

१०) सार्वजनिक क्षेत्रातील बँकांत होणारी घट व खाजगी बँकात होणाऱ्या वाढीमुळे आरक्षण प्राप्त लोकांच्या रोजगारात वेगाने घट होत आहे. कारण खाजगी बँकांचे आरक्षीतवर्गातील लोकांना रोजगार न देण्याचे धोरण सर्वश्रुतच आहे.

१ फेब्रुवारी, २०२१ च्या अर्थसंकल्पात मध्ये भारताच्या अर्थमंत्री श्रीमती निर्मला सीतारामन यांनी सन २०२१—२२ या वर्षासाठी निर्गुंतवणुकीच्या माध्यमातून १.७५ लाख कोटी जमा करण्यासाठी सर्वप्रथम आयडीबीआय बँकेतून सरकार निर्गुंतवणुक करणार आहे. तसेच १२ सार्वजनिक बँकांमधील दोन बँकांच्या खाजगीकरणाचे संकेत दिले असून या बँका बँक ऑफ महाराष्ट्र व पंजाब ॲण्ड सींध बँक राहील याची दाट शक्यता आहे. तसेच सरकार सार्वजनिक क्षेत्रात केवळ सहा मोठ्या बँका ठेवण्याच्या मनस्थितीत असल्याने भविष्यात इंडियन बँक, अलाहाबाद बँक, सेंट्रल बँक ऑफ इंडिया, इंडियन ओवरसीज बँक, युको बँक यांचे विलिनीकरण किंवा खाजकीकरणाची शक्यता मोठ्या प्रमाणात राहीलच. या सर्वाचा परिणाम हा अर्थव्यवस्थेवर तर होईलच मात्र याचा अधिक वाईट परिणाम देशातील सर्वसामान्य जनता व आरक्षीत वर्गावर मोठ्या प्रमाणात झाल्याशिवाय राहणार नाही.

**संदर्भ:**

१) डॉ. दीपक अग्रवाल,मुद्रा, बैंकिंग, लोक वित्त, हिमालया पब्लिशिंग हाऊस प्रा.लि.मुंबई '.

२) डॉ.जी.एन. झामरे, 'भारतीय अर्थव्यवस्था विकास व पर्यावरणात्मक अर्थशास्त्र, पिंपळापुरे ॲण्ड कं. पब्लिशर्स, नागपूर.

3) Datt R. and Sundharam K.P.M. (2016): *Indian economy*. S. Chand and Company Ltd., New Delhi.

४)प्रतियोगीता दर्पण/जून/२०२०/२७

PRINCIPAL
Dr. M. K. Umathe College
Nagpur - 440022